# सुरु झाल्यानंतर पुणे मेट्रोला उदंड प्रतिसाद



माननीय पंतप्रधान श्री. नरेन्द्र मोदी यांनी दि. ०६ मार्च २०२२ रोजी पुणे मेट्रोचे उदघाटन करून गरवारे ते आनंदनगर असा मेट्रोने प्रवास केला . ६ मार्च रोजी दुपारी ३ वाजल्यापासून प्रवाश्यांसाठी मेट्रो सेवा खुली करण्यात आली . साधारणतः दोन वाजल्यापासून सर्व मेट्रो स्थानकांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्युकेपोटी प्रवाश्याची गर्दी वाढू लागली .पुणे मेट्रोच्या स्थानकांची वैशिट्ये आणि मेट्रो रेल्वेची अद्वितीय अशी रचना याच्या उत्युकेपोटी मोठ्या प्रमाणावर प्रवासी स्थानकावर येऊ लागले . प्रत्येक नागरिकांना पुणे मेट्रोच्या पहिल्या प्रवाश्यांच्या धावताना बसून त्या क्षणाचा आनंद घ्यायचा होता. प्रथम ट्रेन ३ वाजता गरवारे ते वनाज व पीसीएमसी ते फुगेवाडी अश्या मार्गावर धावली . दोन्ही ट्रेन मध्ये ७०० ते ८०० प्रवासी एकत्र भेटले होते . " जय भवानी आणि जय शिवाजी " अश्या घोषणांनी गरवारे आणि पीएसीएमसी स्टेशन दुमदुमले होते . मोठ्या प्रमाणावर महिला , मुले , जेष्ठ

नागरिक , यांनी प्लॅटफॉर्म वर गर्दी केली . प्रत्येक प्रवासी  सेल्फी, प्लॅटफॉर्म वर काढून  या क्षणांचे आनंद घेत होते.   या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले कि , " पुणेकरांचा मेट्रो बांदकामादरम्यान  खूप मोठी  आणि खूप चांगला सहयोग दिला . त्यामुळेच हा प्रकल्प यशवीरित्या आणि वेळेत आम्ही सफल झालो . उदघाट्नच्या दिवशी प्रवाश्यांची झालेली संख्या बघून मी खात्रीलायक सांगू इच्छितो कि, पुण्यातले जास्तीत जास्त लोक मेट्रो सेवेचा लाभ घेतील.”




